# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना :-</u>** नागपूर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग क्रं. ०८ मौजा - नागपूर शिट
**{प्रकल्प विभाग}** क्रं. १६४ व न.भु.क्रं. १०२ मोमीनपुरा येथे विद्यार्थीकरीता अत्याधुनिक ई-लायब्ररीचे बांधकाम प्रस्तावित असुन मा. आयुक्त यांनी दि. २८/०६/२०२४ रोजी जुने मोडकळीस आलेल्या वाचनालय इमारतीचे बांधकाम पाडण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान केलेली आहे.

करीता मोमीनपुरा येथे अत्याधुनिक इ-लायब्ररी इमारतचे बांधकामास मा. जिल्हाधिकारी यांची प्रशासकिय मान्यता मिळण्याचे अधिन राहुन जुनी वाचनाल्याची इमारत पाडण्याचा प्रश्न विचारात घेण्यास्तव मा. प्रशासक यांचे मान्यतेस्तव सादर.

**टिप :-**

१. जुन्या वाचनाल्याची इमारत पाडण्याचा खर्च शासनाचे "महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेषे तरतुद" योजने अंतर्गत निधितुन करण्यात येईल.
२. सदर कामाकरीता मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त आहे.
३. सदर कामाकरीता मा. मुख्य अभियंता यांची दि. २६.०६.२०२४ रोजी मंजुरी प्राप्त आहे.
४. विस्तृत टिपन्नी सलंग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 75/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 09/07/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (प्रकल्प), प्रकल्प विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग क्रं. ०८ मौजा - नागपूर शिट क्रं. १६४ व न.भु.क्रं. १०२ मोमीनपुरा येथे विद्यार्थीकरीता अत्याधुनिक ई-लायब्ररीचे बांधकाम प्रस्तावित असुन मा. आयुक्त यांनी दि. २८/०६/२०२४ रोजी जुने मोडकळीस आलेल्या वाचनालय इमारतीचे बांधकाम पाडण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान केलेली आहे.

करीता मोमीनपुरा येथे अत्याधुनिक इ-लायब्ररी इमारतचे बांधकामास मा. जिल्हाधिकारी यांची प्रशासकिय मान्यता मिळण्याचे अधिन राहुन जुनी वाचनाल्याची इमारत पाडण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.